# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र.२५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०४/२०१७

**१) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०३/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आरोपीचे राशन दुकानात राशन घेण्याकरीता गेली असता आरोपीने फिर्यादीला राशन कमी दिल्याने तिने मला राशन कमी का दिले असे म्हटले असतांना आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तिचे हात पकडुन ओढंतान केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५४(अ),२९४,५०९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे.

**२) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही साकोली व लाखांदुर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६९ लिटर हातभट्टी दारु किंमती ५,१४०/—रु. माल व ०७ लिटर ५६० मिली लिटर देशी दारु किंमती २,१६०/—रु. असा एकुण ७,३००/—रु. जप्त करण्यात आला आहे.

**३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.